Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

Original Article

# शाहादा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचा ग्रामपंचायतीच्या प्रशासनातील सहभाग

**श्री.कातडे दत्तात्रय पांडुरंग[1], डॉ.राजेंद्र सुभाष नाडेकर[2]**

[1]राज्यशास्त्र विभाग, श्रीमती.पा.बा.बागल कला व वाणिज्य महाविद्यालय दोंडाईचा, ता–शिंदखेडा, जि–धुळे.

[2]राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला,विज्ञान आणि पी ओ नाहटा, वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ ता.भुसावळ, जि.जळगाव

**Email:** dattatrayakatade@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-171110
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 11(A)
Pp. 65-68
November. 2025
**Submitted:** 16 Oct. 2025
**Revised:** 26 Oct. 2025
**Accepted:** 10 Nov. 2025
**Published:** 30 Nov. 2025

***सारांश***

*शाहादा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचा सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय सहभाग हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विशेषत्वाने दृश्यमान होतो. आदिवासी समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जमातीची मुळे निसर्गाशी जोडलेली असून त्यांची जीवनशैली, परंपरा, रूढी, अर्थव्यवस्था व प्रशासनातील सहभाग यांमध्ये त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतिबिंब दिसते. पावरा जमात नंदुरबार जिल्ह्यातील प्रमुख आदिवासी जमातींपैकी एक असून सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी विविध पाड्यांवर विखुरलेली आहे. स्वातंत्र्यानंतर या जमातीने ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेतला असून ग्रामीण समस्यांच्या निराकरणासाठी, स्थानिक विकासासाठी आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत ही प्रमुख संस्था म्हणून कार्यरत आहे. सांस्कृतिक वारसा, एकजिनसी सामाजिक रचना, स्थानिक नेतृत्व, ग्रामसभा व ग्रामपंचायत या माध्यमातून पावरा जमातीचे लोक लोकशाही प्रक्रियेचा अंगीकार करून प्रशासनात महत्वाची भूमिका बजावतात. प्रस्तुत अभ्यासातून असे दिसते की पावरा जमात स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे आपली राजकीय जागृती, निर्णयक्षम सहभाग आणि ग्रामीण विकास प्रक्रिया मजबूत करण्यासाठी प्रभावी योगदान देत आली आहे.*

***मुख्य शब्द:*** *पावरा आदिवासी जमात, ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामीण विकास, सांस्कृतिक वारसा, सामाजिक रचना, राजकीय सहभाग, नंदुरबार जिल्हा, सातपुडा पर्वतरांग, आदिवासी प्रशासन, ग्रामीण नेतृत्व.*

## प्रस्तावना

मानव जातीच्या उगमातील सर्वात पहिली पृथ्वीवर अवतरीत झालेली व मानवाच्या विकासाला गती देणारी पहिली जमात म्हणून आदिवासी जमातीकडे पहिले जाते. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर आपला विकास तर केलाच पण आपली ओळख सुद्धा निर्माण केली. भोगोलिक स्थानानुसार आदिवासी जमातीच्या इतिहासाची मीमांसा केली असता असे समजते कि आदिवासी जमातीची नाळ निसर्ग आणि निसर्गासी जोडली गेली आहे “वनवासी” किवा “वनांचे रखवाले” असी त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.महाराष्टातील आदिवासी जमाती व उप-जमाती याच्या उगमातील फरक समजून घेण्यासाठी महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील शाहदा तालुक्यातील पावरा आदिवाशी जमातीचा अभ्यास महत्वाचा ठरतो. या आदिवासी जमातीचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील सहभाग कसा आणि किती आहे याचा सखोल अभ्यास या पेपरच्या माध्यामातून करण्यात आला आहे. पावरा आदिवासी जमात शाहदा तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंखेच्या जमाती पैकी एक जमात म्हणून ओळखली जाते. अर्थात या जमातीने महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणात आपली नवी ओळख ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत आपले स्थानिक उद्मेद्वार निवडणुकीत उभे करून सर्वाधिक मत मिळविण्याचा आणि सर्वाधिक उमेदवार निवडून आणण्याचा मानस ठेवला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री.कातडे दत्तात्रय पांडुरंग, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती.पा.बा.बागल कला व वाणिज्य महाविद्यालय दोंडाईचा, ता–शिंदखेडा, जि–धुळे.*

**How to cite this article:**
*कातडे, . दत्तात्रय . पांडुरंग ., & नाडेकर, . राजेंद्र . सुभाष . (2025). शाहादा तालुक्यातील पावरा आदिवासी जमातीचा ग्रामपंचायतीच्या प्रशासनातील सहभाग. Journal of Research and Development, 17(11(A)), 65–68. https://doi.org/10.5281/zenodo.17875032*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17875032

### आदिवासी जमातीची पार्श्वभूमी

आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून ओळखला जाणारा समाज "अति प्राचीन" किवा "मूळचे रहिवासी" तथापि "आदिम" अगर "आदिवासी" या नावाने ओळखले जातात. डॉ. घुर्ये यांनी त्यांना तथाकथित जमातींना मुळचे रहिवासी व मागासलेले हिंदू असे म्हटले आहे. अर्थात डॉ. घुर्ये यांनी भारतीय राज्य घटनेने अनुसूचित जमात (SCHUDELD CAST) हा आदिवासी जमातीबद्दल वापरलेला शब्द मान्य केला आहे.

### आदिवासी जमातीचे स्वरूप

आदिवासी समाज म्हणजे 'अति प्राचीन समाज' किवा 'अतिशय अप्रगत' व 'गौण समाज' असे समीकरण करणे चुकीचे आहे. मानव शाश्रज्ञानी वैज्ञानिक पद्धतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिम समजा विषयीचे चुकीचे ग्रह दूर केले आहेत. पण त्याच बरोबर आदिवासी कोमला म्हणावे या प्रश्नाचे उत्तर आज पर्येत मिळालेले नाही.एक समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणारा एका विशिष्ट भू –प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्र शास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्ष र ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रिती रिवाजांचे प्रामाणिक पाने पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात.

समान नाव असणारा एकच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणारा कुटुंबाचे किवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय. आदिम समाज हा इतर समाजाच्या तुलनेने व कोणत्याही समाजा शिवाय अनेक दृष्टीने वेगळा असल्याचे प्रचीतीला येते. आदिवासी जमातीच्या संदर्भात असे म्हणता येते कि जो समाज विशिष्ट भू-प्रदेश, प्रमाण लघुता, एकाच रक्त संबंधावर आधारित, स्वतःची बोलीभाषा पण लिपीचा अभाव, वेगळी जीवन पद्धती, साधी अर्थ व्यवस्था, सीमित तंत्रविद्या, समान धर्म, सामाजिक एकजिनसीपणा, इत्यादींनी वैशिष्ट्य युक्त आदिवासी समाजाचे वेगळेपण नजरेंत भरते.

### महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती-

महाराष्ट्र राज्यात आदिवासी जमातीला शासनाने आदिम जमात म्हणून ST (SCHULD CAST) या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र 3.०७( ३.०७.७१३) लक्ष चौ कि मी असून त्यातील 0.५० (५०७५७) लक्ष चौ कि मी क्षेत्र आदिवाशी उप योजना क्षेत्राखाली येते. राज्याच्या एकूण क्षेत्राशी हे प्रमाण १६.४९% किवा १६.५% एवढे आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११२३७२९७२ आहे मात्र राज्यातील आदिवासींची लोकसंख्या १०५.१० लक्ष एवढी शिल्लक आहे.महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी १०५.१० लोकसंख्या आदिवासी आहे. महाराष्ट्रातील राज्यातील बहुसंख्य आदिवासी जमाती प्रामुख्याने ठाणे,नाशिक,जळगाव,अहमदनगर, पुणे,नांदेड,अमरावती,यवतमाळ,नागपूर,भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली,रायगड,या जिल्ह्यांत केंद्रित आहे. आदिवासी जमातीचा विचार करता,त्यामध्ये भिल्ल,महादेव कोळी, गोंड, वारली,कोकण,कातकरी,ठाकर,गावित, कोलाम, कोरकू,आंध,मल्हार कोळी,धोदिया, दुबळा,माडिया गोंड,परधान,ह्या प्रमुख जमातींचा प्रामुख्याने समावेश होतो.

### पावरा जमातीचा ईतिहास-

पावरा जमात हि मध्यप्रदेश, गुजरात व महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात राहणारी आदिवासी जमात आहे. या जमातीचा ग्रामपंचायतीच्या राजकारणातील सहबागाचा अभ्यास प्रस्तुत पेपरच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. पावरा जमात हि नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जमातीपैकी एक जमात समजली जाते. या जमातीला भारताच्या इतिहासात खूप पुरातन परंपरा लाभली आहे. पावरा जमातीच्या पुरातन पिढया या सिकंदर राज्याच्या आक्रमणापासून तर आज पावेतो डोंगर दारे व तापी आणि नर्मदा नद्यांच्या कुशीत अर्थात पायथ्याशी अलग अलग वस्ती करून राहत असल्याचे संशोधनामध्ये सापडलेल्या पुराव्यामधून समजते. वास्तविक पाहता पावरा हि जमात पावागढ व त्याच्या आसपास असणाऱ्या डोंगर दऱ्या व लहान लहान नदी व नाले याच्या कुशीत वाढलेली जमात असा उल्लेख पुरातन संशोधनातून सापडतो.

### शाहदा तालुक्यातील पावरा जमातीचे भौगोलिक स्थान व विस्तार-

शाहदा तालुका प्रामुख्याने नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तरेला तापी व नर्मदा नदीच्या जवळ निसर्गरम्य संसाधंनांनी युक्त निर्माण झाल्याचे दिसून येते. नैसर्गिक साधनांची उपलब्धता आणि पर्यावरण विपुलता शहादा तालुक्याच्या विस्तारला करणीभूत आहे. शहादा हे समुद्रसपाटीपासून सरासरी ४५५ फुट उंचावर आहे. सातपुडा पर्वतरांगा शहाद्याच्या उत्तर दिशेला केवळ ३० किलोमीटर दूर असल्यामुळे येथील जमिनीखाली ५ मीटर अंतरावरच खडक लागतो. नैसर्गिक आणि मानवनिर्मित खाणींमुळे,व ऑगस्ट २००६ च्या मुसळधार पावसामुळे शहद्यापासून ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सावळदे या गावामधील मैदानाचे खनन झाले होते. त्यामुळे १० नोवेंबर २००६ मध्ये येथे २.८ रिश्टर स्केलचा भूकंप आला होता. शहरातील कोलाहलापासून दूर असलेल्या या गावात भूकंप मापन केंद्र स्थापित केल्या गेले आहे. जमिनीखालील खडकाच्या वरील माती काही अपवाद सोडले तर शेतीसाठी सुपीक आहे.येथे सरासरी ५५२ मी.मी.पाऊस पडतो. बऱ्याचवेळा इथले हवामान उष्ण असते.उन्हाळ्यात कमाल तापमान ४८°सें.असते.तर हिवाळ्यात ते ९° सें.पर्यंत कमी होते.पावसाळा आणि हिवाळयाचे काही महिने सोडले तर इथले हवामान मुख्यता कोरडे असते भारताच्या २०२१ च्या जनगणनेनुसार शहाद्याची लोकसंख्या ४९६९७ होती.ज्यामध्ये ५२% पुरुष आणि ४८% महिलांची संख्या होती.शहाद्याची सरासरी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

साक्षरता ७१%आहे जी देशाच्या ५९.५% सरासरी साक्षरतेपेक्षा जास्त आहे. पुरुष साक्षरता ७७% आहे तर महिलांची साक्षरता ६५% आहे.

**आदिवासी पावरा जमात-**

पावरा जमात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सक्रीय सहभागी झाल्याचे समजते. आपल्या निसर्ग निर्मित वरदानामुळे या जमातीचे वास्तव्य डोंगर, दऱ्या, नदी, नाले, आणि उंचच उंच टेकड्या यांनी युक्त असा परिसर लाभल्यामुळे पावरा जमातीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. आदिवासी पावरा समाज हा महाराष्ट्र,मध्य प्रदेश व गुजरात यांच्या सीमाभागात राहणारा समाज आहे. पावरा जमातीतील लोक सातपुड्याच्या खासकरून धुळे ,नंदुरबार जिल्ह्यात पायथ्याकडील प्रदेशांत राहतात. महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश ह्या राज्यांत पावरा समाज विखुरलेला असून तेथील भौगोलिक परिसर, पर्यावरण व आजूबाजूला असणाऱ्या इतर समाजासोबतचे सानिध्य ह्यामुळे त्यांच्यात काही प्रमाणात विविधता .पावरा जमातीचे लोक मध्यम बांध्याचे, किंचित सावळया रंगाचे व स्वभावाने लाजरे.पावरा जमातीची पावरी ही मुख्य बोलीभाषा असून तिच्यात स्थानपरत्वे व आजूबाजूला बोलल्या जाणाऱ्या इतर भाषांचा प्रभाव पडलेला आढळतो. नंदुरबार जिल्ह्यातील उत्तरेला असलेल्या नर्मदेच्या काठावर असणाऱ्या पावरांना नोंददळया, अक्राणी (धडगांव) तालुक्यातील डोंगराळ भागात राहणाऱ्यांना भारवट्या, शहादा, तळोदा तालुके, तसेच धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुका ह्या सपाट पट्ट्यात राहणाऱ्यांना देहवाल्या, मध्यप्रदेश व महाराष्ट्र सीमेवर निंबाळया, राठवा, बारेला व पाल्या म्हणतात. या सर्वांच्या बोलीभाषांत, पेहरावात काही प्रमाणात विविधता दिसून येते.

**पावरा जमातीचा सांस्कृतिक वारसा-**

पावरा जमातीने हिंदू संस्कृतीचा वारसा जपला असून बहुविध अशा चाली, रूढी, परंपरा, यांचा मिलाप या पावरा जमातीने साधला आहे.पावरा जमातीची संस्कृतिक माहिती पुढील मुद्यांच्या आधारे दृष्टीस पडते.

**क)** **सन व उत्सव-** पावरा जमात हिंदू धर्मातील बहुतेक सर्व सन व उत्सव साजरे करताना दिसून येते, पण आपल्या सामाजिक पद्धती व नैसर्गिक अनुकूल आणि प्रतिकूल वातावरणाचा या पावरा जमातीवर अनेक रूढी, प्रथा, परंपरा, पद्धती, निर्मितीला कारणीभूत झाला आहे.

**ख)** **रूढी व परंपरा-** आदिवासी जमातीमधील पावरा जमातीच्या रूढी व परंपरा या नंदुरबार जिल्ह्यातील इतर जमातीच्या रूढी व परंपरेप्रमाणेच असल्याचे जाणवते. मात्र वार्षिक सन व उत्सव याचा विचार केल्यास आपल्या असे लक्षात येते कि दीपावली व दसरा या दोन सणांना पावरा जमातीच्या बहुतेक गावांमध्ये यात्रा व उत्सव आळीपाळीने आणि आवडी सवडीने साजरे करताना दिसतात. दसरा या सणाच्या वेळी भोंगऱ्या बाजार अनेक गावांमध्ये भरवला जातो. या बाजारात नाव वधू व वर आपल्या जीवन साथी निवडण्याचे काम करतात.अर्थात पावरा जमातीचे लोक रूढी व आपल्या पुरातन परंपरांना खूप महत्व देतात आणि त्याचे प्रामाणिक पाने पालन सुद्धा करतात.

**ग)** **चाली रिती-** पावरा जमात हिंदू सणांमधील होळी या वार्षिक सणाला खूप महत्व देते कारण या सणाला नंदुरबार जिल्ह्यातील व विशेष करून शहादा तालुक्यातील पावरा जमात आपला महत्वाचा सन मानते. या सानाव्यातिरिक्त या जमातीमध्ये बैलपोळा, नागपंचमी, दसरा, दीपावली, गुढीपाडवा, अक्षय तृतिया, आणि भोंगऱ्या बाजार या परंपरा खूप लाख मोलाच्या मानतात.

**घ)** **पोशाख-** पावरा जमातीच्या पुरुषांपैकी काही जुने लोक अजूनही कमरेला फक्त लंगोट लावतात व त्यावर धोतराने कंबर बांधून वर सदरा, बंडी घालतात. शिकलेले तरुण आता शर्ट-पँट वापरायला लागले आहेत. जुन्या स्त्रिया नाटी (लुगडे) नेसतात तर आताचे स्त्रीया साडी परिधान करू लागल्या आहेत. त्या वाक्या, बाट्ट्या, आहडी, हाकूल, पैंजण, पिंदणा असे चांदीचे पारंपरिक दागिने घालतात.

**ङ)** **देव व देवता-** शाहदा तालुक्यातील पावरा जमात देव मोगरा मातेला खूप मोठ्या प्रमाणात मानते आणि तिची पूजा सुद्धा आदर व श्रध्दा ठेऊन करते. डोंगर देव, वनदेव, अस्ताम्भां ऋषी यांना पावर जमातीच्या प्रत्येक व्यक्ती मनापासून मानते व या सर्वांची पूजा करताना आढळतात.

**च)** **अर्थव्यवस्था-** शेती हे इथल्या लोकांचे उपजीविकेचे मुख्य साधन आहे. शाहदा तालुक्यात साधारणपणे वर्षभर इथे उस,केळी,कापूस,मका,ज्वारी आणि गव्हाचे पिक घेतले जाते. आजूबाजूच्या गावातून लोक इथे खरेदीसाठी आणि आरोग्य सुविधांसाठी येतात. त्यामुळे शहादा हे शहर नेहमी लोकांनी गजबजलेले असते. पुरुषोत्तम मार्केट न.१, पुरुषोत्तम मार्केट नं.२,६४ गाला मार्केट, काशिनाथाभाई मार्केट, पुष्पकमल मार्केट ही काही मुख्य मार्केट आहेत. शहादा शहरामध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, देना बँक, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया यांसारख्या सरकारी बँकांच्या शाखा आहेत. आय. सी. आय. सी. आय. सारख्या खाजगी बँकेची सुद्धा इथे शाखा आहे.या बरोबरच धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड.इथे ऑगस्ट १९९८ पासून एल आय सीची शाखाही आहे.(DDCC) सारखी स्थानिक बँक सुद्धा आहे जी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या सूचीमध्ये सामील आहे.फक्त स्टेट बँक ऑफ इंडिया आणि आय.सी.आय.सी.आय.यांची एटीएम मशीन आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**ग्रामपंचायत व प्रशासन**

स्थानिक स्वराज्य संस्था या आदिवासी जमातीच्या विकासातील व प्रगतीमधील महत्वाचा भाग समजली जाते. स्थानिक पातळीवरचे प्रश्न व समस्या या स्थानिक प्रतिनिधी मार्फत सोडविण्यासाठी पहाडी भागात ग्राम पंचायतीचा आधार आदिवासी घेताना आढळून येतात.लोकशाही शासन पद्धतीचा भारताने स्वीकार केल्यानंतर ग्रामीण प्रशासन चालविण्यासाठी शहरी व ग्रामीण भागात स्थानिक लोकांमार्फत आदिवाशी भागात आदिम प्रशासन चालविले जाते. स्थानिक स्वराज्याची कल्पना भारतीय जमातींना नवी नाही कारण भारतामध्ये मौर्य काळापासून तर ब्रिटीश शासानापार्येत चा काळ विचारात घेतला तर स्थानिक शासनाची जबाबदारी स्थानिक लोकांनी सांभाळलेली आहे असे समजते. ब्रिटीश अमदानीत स्थानिक शासनाचा उल्लेख स्थानिक जबाबदारीचे सरकार असा करीत असत. मात्र ब्रिटीश शासन काळात संपूर्ण भारत एक केंद्रित प्रशासन व्यवस्थेखाली येत होता. आणि मध्यवर्ती व प्रांतिक पातळीवर जबाबदार शासन व्यवस्था अस्तित्वात नवती. मात्र राष्ट्रीय आंदोलनाची तीव्रता जस जासी भारतामध्ये वाढत गेली व लोकांकडून मोठ्या प्रमाणात त्यांना शासनात सहभागी करून घेण्याबाबाद दडपण वाढू लागले तेव्हा तडजोड म्हणून स्थानिक पातळीवर जबाबदार शासन व्यवस्था सुरु केली गेली. अर्थात भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर स्थानिक सरकारचा उल्लेख स्थानिक जबाबदार सरकार असा केला जावू लागला.आधुनिक काळात राज्याचा आकार व लोकसंख्या या दोन्ही गोष्टीचा विचार करता स्थानिक स्वराज्य संस्थेसारखी शासन पद्धतीची नितांत आवशक्यता आहे. 'स्थानिक स्वराज्य' या शब्द प्रयोगातच शासन व्यवस्थेचे स्थानिकत्व स्पष्ट होते. स्थानिक पातळीवरील महत्वाचे प्रश्न जितके स्थानिक शासनाला माहित असतात तितके त्या स्थानापासून दूर असणाऱ्या शासनाला माहित नसतात, त्या प्रश्नांची तीव्रता, स्पोटकता, सोडवणुकीची आवश्यकता त्या प्रश्नाच्या परिसराशी निगडीत असणाऱ्या संस्थेला जितक्या जास्त प्रमाणात जाणवेल त्या प्रमाणात त्या परिघाबाहेर असणाऱ्या संस्थेला जाणवेलच असे नाही, म्हणून सर्वसामान्य व्यक्ती जीवन सुरळीत होण्यासाठी व स्थानिक प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी त्याच ठिकाणी राहणाऱ्या लोकांकडून पुढाकार घेऊन असे प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्थानिक शासनाची नितांत गरज असते.प्रमुख ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था- प्राचीन भारतात स्थिर झालेल्या स्व शासनाच्या क्षेत्रातील प्रमुख संस्था म्हणून पुढील संस्थांचा उल्लेख केला जातो.

**ग्रामप्रमुख-** ग्राम प्रमुख हा गावाचा किंवा खेड्याचा प्रमुख असे दळण वळण साधनांची कमतरता,शेतीप्रधान अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरनाचा अभाव यामुळे नागरी जीवनाचा ग्रामीण जीवनाशी येणारा सबंध मर्यादित होता, ग्राम हा घटक स्वयंपूर्ण व स्वायत्त असा घटक होता. गावाचे प्रश्न,गावातील तंटे- बखेडे यांची सोडवणूक स्थानिक पातळीवर स्थानिक ग्राम प्रमुखाकडून सोडविले जात होते.

**ग्राम सभा-** ग्राम प्रशासनात संघटितपणे काम करणारी हि प्राथमिक संस्था समजली जाते. ग्राम सभा पूर्वी महाराष्ट्रात अस्तिवात होती. ग्राम सभेच्या सदस्यांना कर्नाटकात 'महाजन' तामिळनाडू राज्यात 'पेरुमाक्क्ल' तर महाराष्ट्रात 'महतर' असे म्हणत ग्राम प्रमुख हा ग्राम सभेचा प्रमुख समजला जाई.

**ग्राम पंचायत-** भारतातील विविध जातकांमध्ये ग्राम पंचायतीचा उल्लेख दिसून येतो. पूर्वी ग्राम सभा हि गावाची कार्य कार्यकारणी होती. गाव प्रमुख हा या कार्यकारणीचा प्रमुख असे. पूर्वी ग्रामपंचायतीला ग्राम जनपद, पंचकुळी या नावाने ओळखले जाई.

**निष्कर्ष व अनुमान**

अशाप्रकारे पावरा जमातीचे लोक ग्रामपंचायतीच्या राजकारणात आणि मतदान प्रक्रियेत हिरीहीरीने व अभिमानाने सहभागी होतात. अर्थात पावरा जमातीचा ग्रामीण विकास हा स्थानिक स्व शासनाच्या विविध योजनानि झालेला दिसून येतो. स्थानिक प्रश्न गावातच म्हणजे पाड्यावर सोडविले जातात आणि दळण वळण सुविधांचा अभाव जरी असला तरी या जमातीच्या कल्याण व संवर्धनासाठी गावातील पुढारी, नेतेमंडळी, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील, यांच्या मदतीने ग्रामीण समस्या पाड्यावरच सोडविल्या जातात, आणि त्याला आधार असतो ग्रामपंचायतीचा. सदर पेपरच्या माध्यमातून असा निष्कर्ष काढण्यात येतो कि शहादा तालुक्यातील पावरा जमातीचे लोक ग्राम पंचायतीच्या निवडणुकीत सहभागी होतात आणि आपला ग्रामीण विकास साधण्यासाठी डोंगरदर्यात विविध पाड्यांवर शासनाच्या विविध योजना राबून कल्याणकारी राज्यव्यवस्था निर्मिती करून लोकशाही शासन व्यवस्था ग्रामीण पातळीपर्यत पोहचविण्याचे कार्य ग्रामीण पालिके मार्फत म्हणजे ग्रामपंचायतीच्या मार्फत राबविले जातात

**संदर्भ**


1. आदिवासी भारत,कशाळीकर ज माधव कांबळे,दा जयवंत,अजब पुस्तकालय कोलाहापूर जून-१९८८
2. भारतीय समाजरचना,सौ.अनुराधा भोईटे,बोबडे प्रकाश,म.वि.कुकडे,विद्या प्रकाशन नागपूर,जुलै-१९८३
3. भारतीय समाज,श्याम चरण दुबे,नवी दिल्ली १९९४
4. समकालीन भारतीय समाज शास्त्र,वि एन गाजेन्द्रगढ,वि एन मारुलकर,फडके प्रकाशन पुणे-मार्च २०००
5. भारतीय सामाज्व्यास्था,प्रा रा ना घाटोळे,श्री मंगेश प्रकाशन नागपूर,२००२
6. वनवासी विकास संकल्पना आणि दिशा,आपटे प्रभा व अन्य,आस्वाद प्रकाशन मुंबई
7. ७आदिवासी समाज दशा आणि दिशा,ग क गंधारे,आदिवासी विशेषांक राजूर २००६-२००७
8. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,गोविंद गारे,आदिम साहित्य पुणे- १९७५
9. सातपुड्यातील आदिवासी,सुदाम जाधव,सुलभ प्रकाशन औरंगाबाद-२००२
10. नंदुरबार जिल्हा संखीकीय माहिती कोश
11. आदिवासी महासम्मेलन अहवाल शिंदखेडा २०२२